कृपया प्रसिद्धीसाठी

दि:२९ मार्च २०२४

# प्रिंट मिडिया करिता प्रसिद्धीपत्रक

## विषय: महाराष्ट्रातील 2024 च्या महाराष्ट्रातील लोकसभा व विधानसभा निवडणुकांपूर्वी बहुजन समाजाचं प्रतिनिधित्व करण्याऱ्या राजकीय पक्षांचं बहुजन समाजाच्या अपेक्षांकडे लक्ष वेधण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष.

**पुणे - २९ मार्च, २०२४:** बहुजन समाजाच्या एससी, एसटी आणि ओबीसीं प्रवर्गातील स्वयंप्रेरित सामाजिक कार्यकर्त्यांच्या 'परिवर्तन', ह्या अनौपचारिक संघटनेने 2024 च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांपूर्वी बहुजन समाजाच्या अपेक्षांकडे लक्ष वेधण्यासाठी एक ऑनलाइन सर्वेक्षण केले. गेल्या दोन महिन्यांत झालेल्या ह्या सर्वेक्षणासाठी तयार करण्यात आलेल्या प्रश्नावलीत 5 विभागात 50 प्रश्न विचारण्यात आले. आगामी निवडणुकांमुळे निर्माण झालेली निकड लक्षात घेऊन, परिवर्तन आता राजकीय पैलू जसे की युती, बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राजकीय पक्षांमधील एकता, ईव्हीएम, इत्यादींशी थेट संबंधित असलेल्या 14 प्रश्नांचे निष्कर्ष प्रकाशित करत आहे.

भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी 80 टक्के पेक्षा जास्त असलेले एससी, एसटी आणि ओबीसी हे राजकीय पटलावर दुर्लक्षित राहिले आहेत. भारताच्या लोकसंख्येमध्ये लक्षणीय उपस्थिती असूनही, महाराष्ट्रात प्रामुख्याने बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राजकीय पक्ष, जसे की, बहुजन समाज पक्ष (बसपा), वंचित बहुजन आघाडी (वीबीए), आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) [रिपाई (आ)] इत्यादींना वंचित घटकांच्या समस्यांचे निराकरण करणे अत्यंत कठीण जाते. सर्वेक्षणाचे निष्कर्ष बसपा, वीबीए, [रिपाई (आ)] पक्षांना आगामी निवडणुकांमध्ये अचूक रणनिती आखण्यास उपयुक्त ठरू शकतात. अशी माहिती इनक्राफ्ट टेक्नोलॉजीज प्रा. लि. चे श्री.पंकज जाधव, श्री. दत्तात्रय गोरसे व एडवोकेट अरुण डोळस यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

## ***सर्वेक्षणाचे प्रमुख निष्कर्ष:***

1. **युतीच्या रणनीतीबाबत:**
   सर्वेक्षण सूचित करते की वीबीए, बसपा आणि रिपाई (आ) या पक्षांनी इंडिया गटाबरोबर युती करावी अशीच बहुजन समाजाची अपेक्षा आहे. 63 टक्के सहभागींदारांना वाटते की वीबीए आणि इंडिया गट यांच्यात युती व्हावी. 62 टक्के सहभागींदारांना बसपा आणि इंडिया गट यांच्यात अशी युती अपेक्षित आहे; तर 52 टक्के सहभागींदार रिपाई (आ) आणि इंडिया गट मध्ये अशा युतीची अपेक्षा करतात.

2. **बहुजन समाजाच्या मतदारांच्या पसंती बाबत:**
   49 टक्के (सर्वोच्च) सहभागींदारांनी सूचित केले की बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणा-या राजकीय पक्षांची एनडीए किंवा इंडिया या दोन प्रमुख गटांपैकी एका बरोबर युती झाली नाही तर मतदान करताना वीबीए हा त्यांचा सर्वाधिक पसंतीचा पक्ष असेल. तर 31 टक्के सहभागींदारांनी अशा परिस्थितीत मत देताना इंडिया गटाला पसंती दर्शवली. हे बहुजन समाजातील लोकांमध्ये वीबीएची वाढती लोकप्रियता, तसेच, महाराष्ट्रात इंडिया आणि वीबीए मध्ये युतीची गरज असल्याचे दर्शवते.

3. **बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या राजकीय पक्षांमधील ऐक्याबाबत:**
सर्वेक्षणातील 77 टक्के सहभागीदारांच्या मोठ्या गटाला ह्या पक्षांनी एकत्र येऊन एक मजबूत राजकीय पक्ष उभारावा असं वाटतं. बहुसंख्य, म्हणजे, सर्वेक्षणातील 55 टक्के सहभागींदारांचा असा विश्वास आहे की बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व करणारे सर्व राजकीय पक्ष त्यांच्या आपसातील मतभेद असले तरी आणि त्यांना एकत्र करण्याचे आत्तापर्यंतचे प्रयत्न अयशस्वी झाले असले तरीही, एकत्र येऊ शकतात. तरुण म्हणजे 38 वर्षे वयापर्यंतच्या 65 टक्के स्त्रिया आणि 62 टक्के पुरुष, त्यांची एकजूट होण्याविषयी अधिक आशावादी आहेत.

4. **त्यांच्या एकतेच्या निर्मितीतील अडथळ्यांविषयी:**
हे सर्वेक्षण असे दर्शवते की नेत्यांचा अहंकार, स्वार्थ आणि परस्पर विश्वासाचा अभाव हे प्रमुख अडथळे दूर केले तर बहुजन समाजाचे प्रतिनिधत्व करणाऱ्या पक्षांचं एकत्रीकरण शक्य आहे.

5. **त्यांच्या एकीकरणाच्या शक्यतेबाबत:**
सर्वेक्षणातील 61 टक्के सहभागींदारांना वाटते की महाराष्ट्रातील सध्याच्या परिस्थितीत वीबीए आणि बसपा एका पक्षात एकत्र येऊ शकतात तर 59 टक्के सहभागींदारांनी वीबीए व रिपाई (आ) यांच्यात ऐक्य होण्याची इच्छा व्यक्त केली. तथापि, 54 टक्के सहभागींदारांना बसपा, वीबीए आणि रिपाई (आ) हे तिन्ही प्रमुख पक्ष, सध्या एकत्रित येण्याची कोणतीही शक्यता दिसत नाही; तर 60 टक्के सहभागीदारांना बसपा आणि रिपाई (आ) यांच्यात ऐक्याची शक्यता दिसत नाही.

6. **राजकीय पटला बाबत:**
सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की जरी बहुजन समाज भारताच्या लोकसंख्येच्या 80 टक्के पेक्षा अधिक आहे तरीही त्यांच्या मतांचे विविध राजकीय पक्षांमध्ये विभाजन होत असल्याने त्यांचे प्रतिनिधित्व करणारा कोणताही राजकीय पक्ष केंद्रात किंवा महाराष्ट्रात सरकार स्थापन करणार नाही.

7. **मतदान माध्यमाला प्राधान्य देण्याबाबत:**
सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की 95 टक्के लोकांचा मतदानाचे साधन किंवा माध्यम म्हणून ईव्हीएमवर विश्वास नाही आणि निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रियेसाठी ईव्हीएमपेक्षा पारंपारिक मतपत्रिका निवडण्याची त्यांची इच्छा आहे.

**अधिक माहितीसाठी**
**पंकज जाधव**
**मो नं: ८०८७५१५२००**

**परिवर्तन महासंघातर्फे:**
**श्री.पंकज जाधव, श्री. दत्तात्रय गोरसे व एडवोकेट अरुण डोळस आणि इतर.**